# ज्ञान प्रबोधिनी

सौर माघ १९४६ चे मासिक वृत्त
सौर फाल्गुन १, शके १९४६
दि. २०/२/२०२५

★ ज्ञान प्रबोधिनीच्या तिसऱ्या भवितव्य लेखाचे 'विस्तार' हे साध्यसूत्र आहे. त्याची चार मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे समावेशकता, नवोन्मेषता, सेतुबंधन व प्रभाव. त्या अनुषंगाने माहे सौर माघचे मासिक वृत्त. ★

## ★ समावेशकता ★

### ❖ ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र

पद्मविभूषण डॉ. विजयराव केळकर यांनी त्यांच्या मातोश्री कै. उषा लक्ष्मण केळकर यांच्या स्मृततप्रित्यर्थ केलेल्या सहकार्यातून उषा लक्ष्मण केळकर सहविकास केंद्र सुरू झाले. शुभेच्छा देणे आणि केंद्र उभारणीचे काम पाहणे या उद्देशाने केळकर कुटुंबीयांनी केंद्राला भेट दिली. मा. उमाताई बापट यांनी सहविकास केंद्र उभारणी विषयी पीपीटी द्वारे मांडणी केली.

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

निर्धार प्रकल्पाच्या तीनही शाळांमध्ये शिक्षकांसाठी स्नेहमेळावा आयोजित केला होता. त्यात या वर्षी शाळेत एकही व्यसनाची केस मिळाली नाही याचा मुक्तांगणच्या मुख्याध्यापकांनी पुनरूच्चार केला.

### ❖ शैक्षणिक उपक्रम संशोधिका

**प्रज्ञा विकास कार्यक्रम, पुणे –** प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम पाच केंद्रांवर मोठ्या उत्साहात साजरा झाला. उपस्थित पालक व पाहुण्यांच्या हस्ते या निमित्ताने झालेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. १८० विद्यार्थी व ५० पालक सहभागी झाले होते.

निवडक विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या ''नेतृत्व विकसन गटा''ची कार्यशाळा ज्ञान प्रबोधिनी येथे झाली. निवडक २५ विद्यार्थांना 'समस्या परिहार' या विषयावर युवक दलातील ओमदादा चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

**अनुभव शाळा – पाच केंद्र**

**माता पालक मेळावा –** विद्यार्थ्यांच्या शिक्षणात पालकांचा सक्रीय सहभाग वाढावा आणि त्यांना शालेय उपक्रमांबद्दल अधिक माहिती मिळावी या उद्देशाने माता-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. ११५ पालक सहभागी होते. वाण म्हणून पालकांना पुस्तक दिले.

**प्रजासत्ताक दिन विशेष सोहळा –** विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य, गीते आणि नाटिका सादर केल्या. विविध स्पर्धांतील विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली. स्थानिक कार्यकर्ते आणि भारत फोर्ज कंपनीतील अधिकारी तसेच २१६ विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते.

### ❖ स्पर्धा परीक्षा केंद्र

पुण्यामध्ये दीपस्तंभच्या मनोबल या उपक्रमामध्ये अनाथ, अंध, अपंग आणि मूकबधिर अशा विविध प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांची Co Apt चाचणी घेतली. त्याचे अहवाल तयार करून विद्यार्थ्यांना पाठवण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांचे ऑनलाइन समुपदेशन सुरू केले आहे.

### ❖ छात्र प्रबोधन

**कुमार साहित्य मेळावे :** या महिन्यात पुणे येथील विद्या विकास विद्यालय या शाळेत इ. ८वी व ९वीच्या दोन्ही वर्गांत मिळून एकूण ४० विद्यार्थी उपस्थित होते. सेंट क्रीस्पीन स्कूल या शाळेत तीन तासांच्या मेळाव्यास इ. ८वी व ९वीचे ७२ विद्यार्थी उपस्थित होते. सुमती बालवन, ओझर वाडी या शाळेत तीन तासांच्या मेळाव्यास इ. ७वी-८वीचे ५० विद्यार्थी उपस्थित होते. एस. पी. एम या शाळेत तीन तासांच्या मेळाव्यास इ. ८वी व ९वीचे ३२ विद्यार्थी उपस्थित होते. पद्य वाचन, प्रकट वाचन, मौन वाचन, शाब्दिक खेळ, कवितेला चाल लावणे, कथापूर्ती, निरीक्षण कौशल्ये इ. विषयांना धरून मेळावे घेतले गेले.

**राज्यस्तरीय अभिवाचन व हस्तलिखित स्पर्धा :** ज्ञान प्रबोधिनी-छात्र प्रबोधन, पुणे व मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने अभिवाचन स्पर्धा व हस्तलिखित स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. अभिवाचन स्पर्धेत २१ संघ सहभागी झाले, त्यापैकी तेरा संघ निकषानुसार पात्र ठरले. या तेरा संघांपैकी पाच संघांना बक्षिसे प्राप्त झाली आहेत. तर या वर्षी प्रथमच ५वी ते ७वी, ८वी ते १०वी ह्या दोन गटांत हस्तलिखित स्पर्धा घेण्यात आल्या. दोन्ही गट मिळून हस्तलिखित स्पर्धेसाठी ३६ हस्तलिखिते आली. पुणे, निगडी, बारामती, डोंबिवली, कराड, इचलकरंजी, चोपडा, बदलापूर, अहमदनगर, कणकवली, चाळीसगाव, लातूर येथील संघ मिळून एकूण सुमारे ५०० विद्यार्थी दोन्ही स्पर्धांमध्ये सहभागी झाले होते.

## ★ नवोन्मेषता ★

### ❖ सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र

१. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ डेमोक्रॅटिक लिडरशिप, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीतर्फे घेण्यात येणाऱ्या 'लिडरशिप, पॉलिटिक्स आणि गव्हर्नन्स' या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या मागणीनुसार 'Critical Thinking' (चिकित्सक विचारप्रणाली) या विषयावर तीन दिवसांची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेमध्ये 'चिकित्सक विचारप्रणाली' विषयातील आशयाची सखोलता

(deepening), पुढचा टप्पा (advanced) आणि कामातील उपयोजन (application) याबद्दल सत्रे घेण्यात आली. आशयाची उजळणी, मागील सहामाही सत्रांमध्ये आशयाचे केलेले उपयोजन, युक्तिवाद रचना (argument building), मतदारसंघ व्यवस्थापन (constituency management), पत्रकारिता (journalism) व न्यायव्यवस्था (judiciary) या क्षेत्रांतील नैतिक दुविधा समजून घेण्यासाठी व सोडविण्यासाठीचे अभ्यासनमुने, समस्या परिहार प्रक्रिया, स्वयं-नियमन असे विषय हाताळण्यात आले.

२. 'सामाजिक शास्त्र कट्टा' या उपक्रमाच्या अंतर्गत 'भारतीय केंद्रीय अर्थसंकल्प - विश्लेषण' या विषयावर चार तासांची कार्यशाळा झाली. अभियांत्रिकी, वाणिज्य, मानसशास्त्र, अर्थशास्त्र आणि व्यवस्थापन यासह विविध शैक्षणिक पार्श्वभूमीतून आलेले महाविद्यालयीन विद्यार्थी व इतर असे वीस जण या कार्यशाळेत सहभागी झाले होते.

३. चिकित्सक विचारप्रणाली अभ्यासक्रम (Critical Thinking) DGV College, Chennai - DGV, Chennai कॉलेजमध्ये 'Journalism and Communication च्या बी. ए. आणि एम. ए. च्या निवडक ५० विद्यार्थ्यांसाठी 'The Fundamentals of Critical Thinking' हा ३० तासांचा अभ्यासक्रम राबविण्यात येतो आहे. या अभ्यासक्रमाचा पहिला भाग म्हणून कॉलेजमध्ये पंधरा तासांची कार्यशाळा प्रत्यक्ष घेण्यात आली. अभ्यासक्रमातील पुढील सत्रे दूरस्थ पद्धतीने घेण्यात येतील.

### ❖ शैक्षणिक उपक्रम संशोधिका

**इ. १०वी विद्यार्थी निवासी अभ्यास शिबिर :** प्रकल्पामध्ये प्रथमच इ. १० च्या प्रज्ञा विकास (निवडक विद्यार्थी) विद्यार्थ्यांसाठी तसेच १०वीच्या इच्छुक मुलांसाठी दोन दिवसीय शिबिराचे आयोजन ज्ञान प्रबोधिनी वास्तू वेल्हा येथे करण्यात आले. यात १०वीच्या ६१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मुलींची संख्या जास्त होती. सत्रांमध्ये अभ्यास तंत्र, परीक्षेची तयारी, उत्तरपत्रिका सोडवण्याच्या पद्धती, गटचर्चा, उजळणी आणि नियोजन यावर भर देण्यात आला. गटकार्य, मार्गदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रमामुळे हे शिबिर विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त व प्रेरणादायी ठरले.
**विकास मित्र प्रकल्प, पडसरे** - आश्रमशाळेत सौर माघ १२ (१ फेब्रु.) रोजी विज्ञान प्रकल्प प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. यात वीस प्रकल्प मिळून ७५ विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

- **विकास मित्र प्रकल्प, रोहा - पडसरे आश्रमशाळेतील विज्ञान प्रकल्प प्रदर्शन** - सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

**छोटे सायंटिस्टस् प्रकल्प** - इंटर्नशिप मोड्यूल करिता बीए. बी. एड. आणि बीएससी. बी. एड. या २७ विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसांचे प्रशिक्षण गणपत पर्सेकर कॉलेज ऑफ एज्युकेशन गोवा येथे पार पडले.

छोटे सायंटिस्टस् या प्रकल्पाच्या माध्यमातून एकूण अकरा केंद्रांवरती समस्या परिहार स्पर्धा (V-Solve,Skill-Synch) घेण्यात आल्या. V-Solve ही स्पर्धा इ. ८वी, ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, रोहा, चेन्नई, सोलापूर, हराळी, साळुंब्रे, वडकी या केन्द्रांवरती घेण्यात आली. Skill -Synch ही स्पर्धा ५वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कराड, माणगाव, चेन्नई, हराळी, इचलकरंजी, वडकी, अब्दुललाट या केंद्रांवरती घेण्यात आली. या दोन्ही स्पर्धेसाठी एकूण २८१ शाळा सहभागी झाल्या आहेत.

**ज्ञानसेतू** - दि.२६ जानेवारी रोजी या प्रकल्पांतर्गत ''ज्ञानसेतू कट्टा'' हा कार्यक्रम झाला. विविध राज्यांमध्ये जाऊन आलेल्या स्वयंसेवकांची अनौपचारिक गटचर्चा झाली. मा. विवेकदादा गिरीधारी यांनी कार्यक्रमाचा समारोप केला. एकूण ९० स्वयंसेवक उपस्थित होते.

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

SAPC प्रदत्त संकलनासाठी (data collection) Tool orientation चे दुसरे प्रशिक्षण घेण्यात आले. यासाठी २१ स्वयंसेवक उपस्थित होते. ४९७ (१३ ते २२ वयोगटातील) व्यक्तींकडून प्रश्नावली भरून घेतली आहे.

निरंतर बाल विकास प्रकल्पाचे २२वे सत्र, न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड येथे 'तारांगण व दुर्बिणीतून चंद्र बघणे' असे घेतले होते. हे सत्र निरंतरचे पालक व न्यू इंग्लिश स्कूलचे शिक्षक श्री. विनायक रामदासी यांच्या पुढाकाराने घेतले गेले. एकूण १२३ मुले या सत्रासाठी हजर होती.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र

संगणक विभाग आणि माहिती तंत्रज्ञान पालक संघ मिळून संयुक्तिक उपक्रम 'केटी कट्टा' या नावाने आयोजित केला. विभाग प्रमुख अनुजाताईंनी मुलांना बीबीसीची ''डिजिटल अरेस्ट'' या विषयावर आधारित एक माहितीपूर्ण चित्रफीत दाखवली व त्यावर चर्चा घेतली.

## ★ प्रभाव ★

### ❖ स्पर्धा परीक्षा केंद्र

**अधिकारी मेळावा आणि भेटी, मुंबई** - स्पर्धा परीक्षा केंद्राची विद्यार्थिनी आणि सध्या साहाय्यक आयकर आयुक्त असलेली श्रुती कोकाटे हिच्या विवाहानिमित्त पनवेल येथे वा. सविता कुलकर्णी आणि वा. विवेक कुलकर्णी हे दोघे गेले होते. त्या ठिकाणी आपल्या केंद्राचे सध्या मध्यप्रदेश मधील रेवा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सौरभ सोनवणे व त्याची पत्नी यांची ही भेट झाली.

स्पर्धा परीक्षा केंद्राचे एम.पी.एस.सी.चे सात ज्येष्ठ विद्यार्थी अधिकारी पनवेल महानगर पालिकेमध्ये दुपारी एकत्र आले. स्पर्धा परीक्षा केंद्राच्या त्रिदशकपूर्तीच्या निमित्ताने पुढील वर्षभरामध्ये होणारे अधिकारी मेळावे, भेटी आणि मेंटॉरिंग अशा उपक्रमाविषयी चर्चा झाली. तळेगाव येथे सीआरपीएफच्या युनिटचे डी. आय. जी. वैभव निंबाळकर आय. पी. एस. अधिकारी यांच्या भेटी झाल्या.

### ❖ शैक्षणिक उपक्रम संशोधिका

**प्रेरणासेतू –** प्रेरणासेतू प्रकल्पाअंतर्गत सामाजिक कार्य या विषयावर श्री. पियुष ओझर्डे, श्री. सुशांत चिंचकर, श्री. अभिजितदादा कापरे तसेच श्री. मिलिंद थत्ते यांनी ७० हून अधिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सामाजिक क्षेत्रातील करिअरच्या संधी आणि कक्षा, कामाची गरज आणि लागणारी कौशल्ये तसेच या क्षेत्रातील औपचारिक शिक्षण अशा विविध विषयांवर तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र

1st International Olympic Research Conference, Ahmedabad - जानेवारी महिन्यात अहमदाबाद येथे भारतातील पहिली या विषयातील परिषद झाली. यामध्ये क्रीडाकुल मधील कामावर ऑलिंपिक वरील भरवलेले प्रदर्शन, टाटा ग्रुप बरोबर चालू असलेला ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्प या दोन निबंधांचे सादरीकरण झाले.

राज्य शासनातर्फे राज्यातील खेळाडूंनी ऑलिंपिक स्पर्धांसह आंतरराष्ट्रीय स्तरावर अत्युच्च दर्जाची कामगिरी करण्यासाठी मिशन लक्ष्यवेध ही नवीन योजना राबविण्यात आली. यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा प्रशिक्षण योजनेअंतर्गत ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयाची ॲथलेटिक्सचे प्रशिक्षण केंद्र म्हणून आणि श्रावणी सणस (इ. १०वी) हिची लक्षवेध खेळाडू म्हणून निवड करण्यात आली.

राज्यस्तरीय भूगोल प्रज्ञाशोध परीक्षेत कु. ईशा शेळके (६वी) हिने ९४/१०० गुण मिळवून आणि कु. राधा देव (७वी इंग्रजी माध्यम) हिने ९६/१०० गुण मिळवून रौप्य पदक प्राप्त केले. इ. १०वी मधील शर्वरी गुर्जर हिने १०० पैकी ९८ गुण मिळवून सुवर्ण पदक प्राप्त केले.

**अध्यापक यश –** कलापिनी आयोजित बालनाट्य स्पर्धेत आपल्या विद्यालयातील पूर्व माध्यमिक विभागाने केलेल्या विभागातील अध्यापिका सौ. स्वाती मोरे लिखित 'कायापालट' या नाटिकेस सांघिक उत्तेजनार्थ प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. वैयक्तिक गटात उत्कृष्ट लेखनाचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक सौ. स्वाती मोरे यांना तसेच उत्कृष्ट रंगभूषा व वेशभूषेचे तृतीय क्रमांकाचे पारितोषिक श्री. समाधान सुसर यांना प्राप्त झाले. सकाळ माध्यम समूहाच्या एन. आय. ई. उपक्रमांतर्गत झालेल्या स्पर्धेतही 'कायापालट' या नाटिकेने पिंपरी-चिंचवड शहर पातळीवर द्वितीय क्रमांकाचे सांघिक पारितोषिक तर वैयक्तिक पारितोषिकात उत्कृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषिक सौ. स्वाती मोरे यांनी पटकावले.

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

महिंद्रा आणि महिंद्रा, चाकण यांच्यासाठी कंपनीमधील कामगार आणि त्यांच्या जोडीदारासाठी 'जोडी तुझी माझी' या अंतर्गत 'कुटुंब आरोग्य' यावर प्रशिक्षण कार्यक्रम झाला. या प्रशिक्षणात एकूण ९६ जण सहभागी झाले होते.

## ★ सेतुबंधन ★

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

सौर माघ ७ ते १३ (२७ जाने. ते २ फेब्रु.) दरम्यान Qualitative and Quantitative Research in Social Sciences: Methods, Data Analysis and Academic Writing या विषयावर सात दिवसांची कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत सहभागी झालेल्या २३ सदस्यांपैकी आठजण सध्या पीएच. डी. करत आहेत. चौदा विषय तज्ज्ञांनी कार्यशाळेत विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

## विभागांचे चालू कामाचे वृत्त

### ❖ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

आठवी-नववीच्या निवडक विद्यार्थ्यांना कवितेविषयी सखोल मार्गदर्शन करण्यासाठी प्रसिद्ध सिने नाट्य दिग्दर्शक, निर्माता, पटकथा-संवाद लेखक व तितक्याच समर्थपणे गीतलेखन, जाहिरात लेखन करणारे श्रीरंग गोडबोले दोन दिवस आले होते.

इयत्ता पाचवीसाठी प्राचीन भारतीय नाण्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. मा. सूरजसिंह गायकवाड यांनी मुलांना आपला संग्रह पाहण्यासाठी उपलब्ध करून दिला आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये ऐतिहासिक आणि दुर्मिळ नाणी आणि काही नकाशे होते.

### ❖ संवादिनी (स्त्री-शक्ती प्रबोधन, शहरी)

या महिन्यात 'भारत इतिहास संशोधक मंडळ' या संस्थेला भेट देऊन तेथील कार्य समजून घेतले. WURTH - ITAP प्रकल्पासाठी आणि कर्मवीर भाऊराव पाटील विद्यानिकेतन, येरवडा (एकूण संख्या – ११४) येथे उमलत्या वयाशी गटाची सत्रं झाली. 'स्व'रूपवर्धिनी मध्ये 'सहजीवनाच्या उंबरठ्यावर' ही कार्यशाळा झाली. व्हिजन इंटरनॅशनल स्कूल येथे उमलत्याची सर्व सत्रं पूर्ण झाली.

**संवादिनी शिरूर –** मलठण व शिरूर येथील जिल्हा परिषद शाळेत ५४३ विद्यार्थ्यांसाठी ओळख स्पर्शाचीचे सत्र घेतले. बालाजी इंग्लिश स्कूल येथे उमलत्या वयाशीची पाच सत्रं घेतली.

- **पौड रस्ता, औंध, सोलापूर संवादिनी, विस्तारकार्य यांचा मध्यप्रदेश दौरा –** सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र

**प्रतिज्ञाग्रहण समारंभ –** कै. वामनराव उपाख्य भाऊ अभ्यंकर यांच्या स्मृतिदिना निमित्त सौर माघ २७ (१६ फेब्रु.) रोजी निगडी केंद्रात प्रतिज्ञाग्रहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. युवक आणि पालक मिळून नऊ जणांनी प्रथम प्रतिज्ञा घेतली. श्रीरामदादा इनामदार व शुभमदादा गायकवाड यांनी व्यवहाराला अनुसरून तर प्रांजलीताईने बोरसे हिने वैराग्य पूर्वक तृतीय प्रतिज्ञा घेतली. मा. संचालकांनी सर्व प्रतिज्ञितांना शुभेच्छा देऊन सर्वांना मार्गदर्शन केले. प्रतिज्ञा घेण्याचे नेमके उद्दिष्ट काय असू शकते आणि ते कसे साधायचे हे विस्तृत पद्धतीने सांगितले.

व्यवहार पूर्वक वैराग्य आणि वैराग्यपूर्वक व्यवहार या दोन्हींचा समतोल साधता यायला हवे तरच आपली जीवनशैली व्रतानुकुल बनते आणि आपली प्रतिज्ञा व निश्चय अधिकाधिक पक्का होत जातो असेही त्यांनी सांगितले.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी हराळी केंद्र

**उत्तरदायी सदस्य मेळावा –** हराळी केंद्रातील उत्तरदायी सदस्यांसाठीचा तिसरा मेळावा झाला. मी ज्ञान प्रबोधिनीचा महत्त्वाचा आणि जबाबदार सदस्य असून मला प्रबोधिनीचे काम करायला आवडते असे स्वतःला वाटणाऱ्या सदस्यांना प्रबोधिनीची ओळख होऊन सर्वसाधारण प्रबोधिनीपणाची मूल्ये त्यांनी व्यवहारिक जीवनात आणि कामात वापरावीत या उद्देशाने मेळावे घेणे सुरू आहे.

- **उत्तरदायी सदस्य मेळावा – सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.**

राजीव गांधी विद्यालय, खेड ता. लोहारा येथे वाचनाची गोडी लागावी म्हणून छात्र प्रबोधनच्या अंकांवर आधारित मेळावा घेण्यात आला. पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातील शिक्षकांची कर्डीलवाडी (शिरूर) व गरवारे बालभवन या दोन ठिकाणी अभ्यास सहल झाली. माध्यमिक विभागात सेवालाल महाराज जयंती पार पडली. या वेळेस बंजारा समाजातील विद्यार्थ्यांनी आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवले.

**पूरक शिक्षण : आनंदशाळा :** आनंदशाळेतील मुलांची प्रत्येक रविवारी ज्ञान प्रबोधिनी केंद्र भेट झाली. त्यामध्ये आत्तापर्यंत ३०० विद्यार्थी सहभागी झाले. जकणी येथील आनंद घराचे उद्घाटन केंद्रप्रमुख अभिजीतदादा यांच्या हस्ते झाले. उद्घाटन कार्यक्रम गावकऱ्यांच्या व मुलांच्या सहभागातून पार पाडण्यात आला.

**प्रदेश विकसन :** बोअरवेल रिचार्ज संदर्भात ऊर्ध्वम संस्थेच्या माध्यमातून ढोकी गाव समूहातील दूधगाव येथील चौदा बोअरवेल रिचार्जचे काम झाले. ढोकी गाव समूहातील दूधगाव, वाखरवाडी व कावळेगाडी येथील स्थानिक जलदूत यांच्या माध्यमातून ७० शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. आरोग्य प्रकल्पातील हराळी गाव समूहातील द. जेवळी, स. हिप्परगा, हराळी, शिवनगर, करवांजी येथील दुर्धर आजार झालेल्या ३२ व्यक्तींना वैद्य, समुपदेशक, सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह भेटी देऊन गोळ्या-औषध यासह समुपदेशन करण्यात आले.

**स्त्री-शक्ती प्रबोधन :** शिवनगर, स. हिप्परगा, दक्षिण जेवळी, बालाजी नगर, करवंजी आणि केंद्रातील महिला सदस्या मिळून एकूण १५५ महिलांची हिमोग्लोबिन तपासणी झाली. याच गावांमध्ये महिलांच्या गाव बैठका झाल्या.

### ❖ कौशल्य प्रशिक्षण केंद्र

**छोटे इंजिनिअर प्रकल्प स्पर्धा** - छोटे इंजिनिअर या उपक्रमाचे हे दुसरे वर्ष! मागच्या वर्षी दोन शाळांमध्ये आणि या वर्षी अजून तीन म्हणजे एकूण मिळून पाच शाळांमध्ये हा उपक्रम वर्षभर सुरू आहे. इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी हा तंत्रशिक्षण विषयातील प्रकल्प आपण घेत आहोत. एकूण मिळून ४०५ विद्यार्थ्यांपर्यंत आपण या निमित्ताने पोहोचलो आहोत. या वर्षभर सुरू असलेल्या नियमित सत्रांमधून विद्यार्थ्यांमध्ये काय बदल होतात असे बघण्यासाठी ही प्रकल्प स्पर्धा आयोजित केली जाते.

- **छोटे इंजिनिअर प्रकल्प स्पर्धा –** सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

**कार्यशाळेतील काही उपक्रम :** वेल्डर तुकडीमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रिकल लॅबमध्ये प्रात्यक्षिके करण्यासाठी लागणारे तीन टेबल तयार केले आहेत. तसेच इलेक्ट्रिशियन तुकडी मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांनी ओव्हर हेड प्रोजेक्टर करता केबल टाय बसवणे त्याचप्रमाणे ऑफिसमध्ये मेनस्विचपासून वायरिंगचे काम करताना मदत केली. अर्थिंग केबलचे काम करण्यासाठीची तयारी केली.

### ❖ नागरी वस्ती अभ्यासगट

अप्पर इंदिरा नगर, विश्वकर्मा शाळा, येथे विद्याव्रत संस्कार शिबिर झाले. ''विद्याव्रत म्हणजेच चांगल्या सवयी, चांगला माणूस''! जुलै मध्ये सातवीच्या मुलांचे सहा दिवसांचे शिबिर झाले होते. विद्याव्रत शिबिर आधी झालेले असल्यामुळे आत्ता ''चला मुलांनो, संकल्पांवर बोलू काही...'' हे शिबिर घेतले. सौर माघ ८ ते १० (२८ ते ३० जाने.) या तिन्ही दिवशी दुपारी १ ते ६ असे शिबिर झाले. सौर माघ ११ (३१ जाने.) रोजी सकाळी ८ ते ९.३० विद्याव्रत संस्कार झाला. कृतिखेळ, खेळ, चित्रफिती बघून त्यावर चर्चा अशा अनेक गोष्टी या तीन दिवसांत झाल्या. एकूण १४४ जणांच्या उपस्थितीत विद्याव्रत सोहळा उत्तम झाला.

- **विद्याव्रत संस्कार शिबिर, विश्वकर्मा शाळा –** सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

### ❖ युवती विभाग, पुणे

**क्रीडा प्रात्यक्षिके २०२५ –** सौर माघ ६ (२६ जाने.) रोजी पुणे केंद्रातील युवती विभागाच्या सर्व दलांनी एकत्र येऊन क्रीडा प्रात्यक्षिके सादर केली. खाशाबा जाधव क्रीडा निकेतन, सरिता नगरी, सिंहगड रोड येथील मैदानावर ही प्रात्यक्षिके झाली. यात शालेय गटातील २०९ युवती (प्रशालेय व प्रबोध शालेय मिळून) महाविद्यालयीन व प्रौढ गटातील गटांतील ७५ युवती (मार्गदर्शिका, स्वयंसेविका मिळून) सहभागी झाल्या होत्या.

- **क्रीडा प्रात्यक्षिके २०२५ –** सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

### ❖ स्पर्धा परीक्षा केंद्र

**सीमावर्ती Mains वर्ग (APPSCE)** - सौर पौष २५ ते माघ ५ (१५ ते २५ जाने.) या काळात एकूण आठ दूरस्थ सत्रे झाली. या सत्रांमधून विषयांचे orientation तसेच अभ्यासाला लागणारे नियोजन आणि अभ्यास कौशल्य याची सत्रे झाली. विद्यार्थ्यांना प्रत्येक गटात अधिमित्र जोडून दिले आहेत, ते त्यांचे साप्ताहिक नियोजन तसेच येणाऱ्या वैयक्तिक अडचणी यासाठी मदत आणि मार्गदर्शन करत आहेत.

UPSC All India Test Series - आसाम, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, जम्मू काश्मीर आणि छत्तीसगड या राज्यांमधील विद्यार्थ्यांसाठी

एकूण बारा सराव परीक्षांचे आयोजन केले आहे.

१. स्पर्धा परीक्षा केंद्राचे २०२३ तुकडीचे श्री. वसंत दाभोळकर (आयएएस - अंदमान) यांचे मार्गदर्शन सत्र या विद्यार्थ्यांसाठी झाले. सरांनी या सत्रात प्रक्रिया, पुढील काही महिन्यांचे नियोजन आणि या सगळ्यात येणाऱ्या अडचणींना कसे हाताळावे यासाठी मार्गदर्शन केले.

२. वा. सविताताई कुलकर्णी यांचे अभ्यास पद्धती यावर सत्र झाले. दोन्ही वर्गांना सरासरी ३० विद्यार्थ्यांचा गट उपस्थित होता.

या सत्रांच्या व्यतिरिक्त दोन विषयांच्या MCQ परीक्षा झाल्या. यात सुद्धा सरासरी २८-३० जणांनी सहभाग घेतला.

या परीक्षांच्या पूर्व तयारीसाठी प्रत्येक विषयाची उजळणी सत्रांची recording विद्यार्थ्यांना पाठवण्यात आली.

**सीमावर्ती प्रदेश व्यक्ती भेटी -**

१. मूळ आसामचे पण आता पुण्यात स्थायिक असलेले आणि अनेक वर्षांपासून प्रबोधिनीच्या आसाम मधील विविध उपक्रमांसाठी सोबत असणारे श्री. अरिंदम अधिकारी यांनी स्पर्धा परीक्षा केंद्राच्या कार्यालयात भेट दिली. सध्या सुरू असलेल्या UPSC All India Test Series मध्ये त्यांच्या माध्यमातून दहा विद्यार्थी जोडले गेले आहेत. भेटीदरम्यान RIWATCH मध्ये मागील वर्षी जसा उपक्रम झाला तसाच उपक्रम आसाममध्ये घ्यावा यासाठी ते बरेच आग्रही होते.

२. सौर माघ १६ (६ फेब्रु.) रोजी RIWATCH चे संचालक श्री. विजय स्वामी सर यांनी कार्यालयाला भेट दिली. त्यांच्या सोबत पण आता सुरू असलेले दोन्ही उपक्रम आणि या वर्षी वर्गांचे कसे नियोजन करता येईल या बद्दलची चर्चा झाली.

## ❖ स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण

**कृतज्ञता सोहळा -** गेली अठरा वर्षे वेल्हे तालुक्यात गरोदर माता तपासणी दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी नियमितपणे चालू होती. हे सगळे काम व्यवस्थित पार पडण्यासाठी डॉ. वैशालीताई बिनीवाले यांचे खूप मोठे सहकार्य होते. योग्य पद्धतीने तपासणी करून महिलांचे व बाळाचे आरोग्य सुखकर होईल असे उपचार आणि मार्गदर्शन करणे असा त्यांचा उपक्रम होता. या नित्य कामात अजून काही बदल किंवा भर या दृष्टीने पुढील विचार अशी एक बैठक वैशालीताईं बरोबर झाली.

**कातकरी विकास प्रकल्प : आरोग्य तपासणी** - करंजावणे येथे पाच वस्त्यांवरील ५१ जणांची (आठ पालक + ४३ मुले-मुली) जनरल तपासणी स्नेहसेवा/मैत्रेय चॅरीटेबल ट्रस्ट यांच्या तर्फे करून घेण्यात आली. यासाठी पुण्यातून डॉ. मुकुंद संगमनेरकर, ट्रस्ट अध्यक्ष डॉ. राधा संगमनेरकर व ट्रस्ट सचिव नीला सरपोतदार आले होते. डॉक्टरांनी स्वच्छतेबद्दल मुलांना व पालकांना माहिती सांगितली. मुलांना तपासणी करून खेळणी, कपडे, खाऊ दिला. त्या-त्या वस्तीवरील पालकांशी बोलून औषधे दिली. विशेष म्हणजे आपण आत्तापर्यंत त्या त्या वस्तीवर तपासणी घेत होतो. यावेळी सर्व वस्त्यांना निरोप देऊन करंजावण्यात यायला सांगितले होते आणि ५१ जण वेगवेगळ्या वस्त्यांवरून आले होते. वस्तीवरही आरोग्य तपासणीसाठी येऊ नका म्हणणारे लोक स्वतःहून तपासणीसाठी आले.

**किशोर - किशोरी विकास उपक्रम - विद्याव्रत संस्कार -** शिवनेरी मंगल कार्यालय, वर्वे (खेड शिवापूर) येथे सौर माघ १२ (१ फेब्रु.) रोजी विद्याव्रत संस्कार झाला. जुलै २०२४ पासून वर्वे, शिवरे, कुसगाव येथील तीन शाळांत साप्ताहिक विद्याव्रत पूर्वतयारी तासिका घेण्यात आल्या. तसेच डिसेंबर महिन्यात दोन दिवसांचे निवासी शिबिर घेतले. या तीन शाळांतील ९६ मुलं-मुली तसेच वेल्हे सहनिवासातील इ. ८वीतील दहा मुली अशा एकूण १०६ मुला-मुलींनी विद्याव्रत घेतले.

- **किशोर-किशोरी विकास उपक्रम, विद्याव्रत संस्कार -** सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

## ❖ शैक्षणिक साधन केंद्र

**आनंदी शिक्षण प्रकल्प :** प्रशिक्षण - सौर १९ व २० माघ (८ व ९ फेब्रु.) हे दोन दिवस आनंदी शिक्षण प्रकल्पात सहभागी शिक्षकांसाठी ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथे चौथे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. नागर वस्ती, पुणे, सांगलीचे व कर्णबधिर मुलांच्या शाळांमधील असे एकूण वीस शिक्षक दोन्ही दिवस उपस्थित होते. भाषा व गणित या विषयांमध्ये मुलांना येणाऱ्या अडचणी ओळखून त्याचे निवारण करण्यासाठी काय उपाय योजना करावी व त्यासाठी कसे साहित्य तयार करावे याबाबत या प्रशिक्षणात मार्गदर्शन करण्यात आले. तसेच ॲपमध्ये माहिती भरताना येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय याबाबतही उपस्थित प्रशिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले.

**सीमावर्ती राज्य प्रशिक्षण -** अरुणाचल प्रदेश प्रशिक्षण - जम्मू -काश्मीर - DIET, बांदीपुरा येथील संगणक प्रयोगशाळेत आभासी प्रयोगशाळेतील प्रयोगांचे प्रात्यक्षिक सादर केले. पाकिस्तान सीमेजवळ असलेले Aspirational ब्लॉक मनकोट, पूंछ येथे दोन दिवसीय प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम झाला. अध्यापनासाठी साहित्य निर्मिती कौशल्ये वाढवण्यावर भर दिला.

- **सीमावर्ती राज्य प्रशिक्षण -** सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

## ❖ ज्ञान प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र

**स्नेहसंमेलन, आनंद मेळावा व महिला मेळावा -** विद्यार्थ्यांच्या कला कौशल्यांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे, विक्री कौशल्य समजावे व समाज संपर्क व्हावा या उद्देशाने विद्यालयात आनंद मेळावा, महिला मेळावा व स्नेहसंमेलन घेण्यात आले. आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध खाऊचे व विक्रीचे दहा स्टॉल लावले होते. या बरोबर समांतर महिला मेळावा घेण्यात आला. त्यामध्ये पंचक्रोशीतील १२६ महिला उपस्थित होत्या. स्नेहसंमेलनास ५०० हून अधिक पालक उपस्थित होते.

**समस्या परिहार स्पर्धा २०२५ -** छोटे सायंटिस्ट अंतर्गत विद्यालयात समस्या परिहार( व्हि. सॉल्विंग) ही स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये मावळ व मुळशी तालुक्यातील चौदा शाळांचे १०१ विद्यार्थी आणि बारा विज्ञान शिक्षक यांनी भाग घेतला होता. ज्ञान प्रबोधिनी पुणे, दुर्गादेवी चॅरिटेबल ट्रस्ट व ग्राम प्रबोधिनी साळुंब्रे यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा झाली. त्यामध्ये इ.आठवी व नववी असे दोन गट होते.

इ. आठवीसाठी - साऊंड फ्रूफ क्लासरूम. इ. नववीसाठी ब्रिज (पूल बनविणे) हे विषय देण्यात आले होते. ग्राम प्रबोधिनीस दोन्ही गटांमध्ये दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले.

**यश –** मातृ मंदिर विश्वस्त संस्था निगडी आयोजित समूह गायन व अन्य स्पर्धा यामध्ये विद्यालयाचा पश्चिम महाराष्ट्र विभागात पोवाडा गायन मध्ये प्रथम व श्रमदान स्पर्धेत राज्यात तिसरा क्रमांक प्राप्त झाला. ट्रॉफी, प्रमाणपत्र व ४,००० रुपये रोख रक्कम असे बक्षीस म्हणून विद्यालयास प्राप्त झाले.

## ❖ ज्ञान प्रबोधिनी सोलापूर केंद्र

**पूर्व प्राथमिक विभाग –** बालशिक्षणातील प्रबोधिनीत चालू असलेले नावीन्यपूर्ण शनिवार उपक्रम इतर शाळांतील शिक्षकांपर्यंत पोहोचावेत या उद्देशाने पूर्व प्राथमिक विभागातर्फे बाल शिक्षण कृती संशोधन (१.२) परिषद झाली. या परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून बालविकास प्रकल्प अधिकारी, सोलापूर शहर पश्चिम बीटच्या पर्यवेक्षिका सौ. रोहिणीताई कुलकर्णी, सिध्देश्वर बाल मंदिर पूर्व प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका सौ. शशीकलाताई बुरहानपुरे, उपस्थित होते. तसेच प्राथमिक जिल्हा परिषद शिक्षक, अॅकॅडमीचे संचालक, अंगणवाडी शिक्षिका, महानगरपालिका शिक्षिका, असे २५ सदस्य उपस्थित होते. सणसमारंभातून शब्दसंग्रहाची वाढ होण्यासाठी केलेले प्रयत्न व हजार एक नवीन शब्द मुलांपर्यंत कसे पोहोचले हे पीपीटीद्वारे मांडण्यात आले.

ज्ञान प्रबोधिनी संपर्क केंद्र बदलापूर येथील शिक्षकांनी अनुभवली 'कृती संशोधन परिषद' - बदलापूर येथे ज्ञान प्रबोधिनी सोलापूर पूर्व प्राथमिक विभागातर्फे बाल शिक्षण कृतिसंशोधन परिषद झाली. या परिषदेत बदलापूर परिसरातील ४८ बालशिक्षिका उपस्थित होत्या.

**माध्यमिक विभाग :** इयत्ता ८वीच्या विद्यार्थ्यांचा विद्याव्रत समारंभ झाला. यामध्ये ८२ विद्यार्थी, पालक, शिक्षक सहभागी झाले होते. आकाशवाणी सोलापूर केंद्राचे निवेदक व प्रिसिजनच्या वाचन अभियानाचे वाचक दूत श्री. सुधीरदादा खेडगीकर आणि अखिल भारतीय वारकरी मंडळाचे जिल्हाध्यक्ष ह. भ. प. सुधाकर महाराज इंगळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**मणिपूर दौरा –** डोंगराच्या पायथ्याशी व सुविधांपासून वंचित हैरोक (मणिपूर राजधानी इंफाळपासून ३५ कि.मी.) गावात आणि डोंगर दऱ्यातील दुर्गम अशा मरींग जनजातीच्या मची (इंफाळपासून ७० कि.मी.) गावात ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी दूरस्थ प्रशिक्षण वर्ग सुरू केले. मची येथे १९ तर हैरोक येथे ३० मुला- मुलींची उपस्थिती होती. दोन्ही ठिकाणी युवकांसाठी ऑनलाईन संगणक प्रशिक्षक वर्ग सुरू केले. हैरोक येथे शिलाई प्रशिक्षण केंद्र देखील सुरू केले. त्यात चार महिला सहभागी झाल्या. मची येथे श्री. मोफुनजी तर हैरोक येथे श्री. चित्तरंजनजी हे स्थानिक सदस्य केंद्रांचे समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत.

**सहनिवासातील मणिपुरी विद्यार्थ्यांनी गाजवली मॅरेथॉन स्पर्धा** - लोकमत आयोजित Campus Clubs, Solapur, Children Run मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. १५ वर्षाखालील गटात सात किलोमीटर स्पर्धेत २९७ मुलांमधून आपले विद्यार्थी प्रेशस होराम (७वी) याने दुसरा तर सिमका होराम (७वी) याने तिसरा क्रमांक मिळवला.

**प्राणायाम वर्ग :** प्राणायाम वर्गातील ३२६ महिलांची देवदर्शन, स्नेहवर्धन आणि प्रबोधन व्हावे या उद्देशाने पंढरपूर, मंगळवेढा, माचणूर येथे सहल संपन्न झाली. पौष एकादशीला भक्तिमय वातावरणात विठ्ठलाचे दर्शन झाले. त्यानंतर इस्कॉन मंदिरात राधा-कृष्णाचे दर्शन झाल्यावर ह. भ. प. मा. चंदाताई तिवाडी यांनी भारूडातून 'स्वविकास व समाज विकास' या विषयावर प्रबोधन केले.

## ❖ डोंबिवली विस्तार केंद्र

**कार्यकर्ता मेळावा –** केंद्राच्या त्रिदशकपूर्ती निमित्ताने सौर माघ १३ (२ फेब्रु.) या दिवशी कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला. विविध गटातील कार्यकर्त्यांमध्ये एकीची भावना वाढावी, मैत्रीचे संबंध दृढ व्हावते तसेच जुन्या अनुभवी कार्यकर्त्यांकडून त्यांचे अनुभव जाणून घेऊन त्यातून पुढे सर्वांना कामाची प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा मेळावा आयोजित केला होता. कार्यसंकल्प आढावा, गटकार्य, चर्चासत्र, प्रबोधिनीत व डोंबिवली केंद्रात मागील दहा वर्षांत झालेले विशेष उपक्रम-नवीन वास्तू याचे निवेदन झाले. त्यानंतर मा. महेंद्रभाई यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. एकूण ६१ सदस्य सहभागी झाले होते.

## ❖ ठाणे स्थायी संपर्क केंद्र

**संवादिनी – ओळख स्पर्शाची –** ओळख स्पर्शाची दोन सत्रे शाळांमध्ये घेतली गेली. विद्यार्थ्यांना चांगला स्पर्श व वाईट स्पर्शाची जाणीव करून देत १२६० विद्यार्थ्यांपर्यंत पोचण्याचा प्रयत्न केला.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत ठाण्यातील एका मोठ्या सोसायटीत मातृभूमिपूजन केले गेले. वेगवेगळ्या वयोगटातील अंदाजे ६० सदस्य उपस्थित होते.

## ❖ संस्कृत संस्कृति संशोधिका

ज्येष्ठ उद्योजक श्री. नितीनभाई देसाई, मदर्स रेसिपी, देसाई आय हॉस्पिटल इ. चे सर्वेसर्वा यांचा सहस्रचंद्र दर्शन सोहळा ज्ञान प्रबोधिनी च्या पद्धतीने साजरा झाला. श्री. मोहनराव गुजराथी व वाच. नलिनी गुजराथी यांचा या कार्यक्रमात मोठा सहभाग होता. विविध मान्यवर व समाज गटाचे प्रतिनिधी या कार्यक्रमाला उपस्थित होते. प्रबोधिनीचे पौरोहित्य या निमित्ताने एका वेगळ्या गटात पोहोचायला मदत झाली.

गीता धर्म मंडळात, वाच . सुजाता बापट यांचे ''समर्थ रामदासांची भिक्षा पद्धती-एक जगदोध्दाराचे साधन'' या विषयावर व्याख्यान झाले.

(पान क्र. ७ व ८ या पानांवरील छायाचित्रांना त्यासंबंधीचे वृत्त जोडले आहे. छायाचित्राला स्पर्श केल्यास वृत्त वाचता येईल.)



विकास मित्र रोहा, पडसरे आश्रमशाळेतील विज्ञान प्रकल्प प्रदर्शन, २०२५



निगडी : प्रतिज्ञाग्रहण समारंभ



हराळी : उत्तरदायी सदस्य मेळावा




संत्रिका : ज्येष्ठ उद्योजक नितीनभाई देसाई यांचा सहस्रचंद्र दर्शन सोहळा



संवादिनी (स्त्री-शक्ती प्रबोधन) - मध्यप्रदेश दौरा



साधन केंद्र : सीमावर्ती राज्य प्रशिक्षण



स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण - किशोर-किशोरी विकास उपक्रम
विद्याव्रत संस्कार




कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर
छोटे इंजिनिअर प्रकल्प स्पर्धा



क्रीडाकुल हिवाळी शिबिर




नागरी वस्ती अभ्यासगट : विद्याव्रत समारंभ



युवती विभाग : क्रीडा प्रात्यक्षिके